# मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

**दावा क्रमांक १८१/२०१८**

सौ. शोभा शिवाजी बेंद्रे **---- वादी**

***विरुध्द***

१) यशश्री महिला नागरी सहकारी
पतसंस्था मर्या. **---- प्रतिवादी**
आणि इतर.

## <u>निशाणी-१३५ वरील आदेश</u>

१) प्रतिवादी क्र.२ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.७ ने दाखल केलेल्या प्रतिदाव्याला कैफियत दाखल करण्याची परवानगी देऊन पुराव्याकामी वाचण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र.२ चे म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.७ ने त्यांच्या कैफियतसोबत प्रतिदावा दाखल केला आणि त्यावर न्यायालयाने फाईल असा आदेश पारित केला आणि त्यावर प्रतिवादी क्र.२ यांचा कोणताही खुलासा मागितला नाही. परंतु चौकशीला नेमल्यानंतर प्रतिदाव्याबाबत प्रतिवादी क्र.२ यांना माहिती झाली. प्रतिवादी क्र.७ यांनी दाखल केलेल्या प्रतिदाव्याला या प्रतिवादीचे सविस्तर कैफियत दाखलकरणे आवश्यक आहे.

२) प्रतिवादी क्र.२ च्या अर्जाला वादीने उत्तर दिऊन नमुद केले की, प्रतिवादी क्र.७ यांनी दि.१३/०७/२०२० रोजी दुरुस्तीदाव्यात कैफियत व प्रतिदावा दाखल केला आहे आणि प्रतिवादी क्र.२ हे दि.१९/१२/२०१८ रोजी हजर झाले. प्रतिवादी क्र.२ यांनी कैफियत दाखल केली आणि त्यानंतर सदर प्रकरणात दि.१३/०७/२०२२ रोजी वादीने सरतपास दाखल करुन वादी साक्षीदाराची प्रतिवादी क्र.२ यांनी उलटतपासणी घेतली. सदरचे प्रकरण प्रतिवादी यांच्या पुराव्याकरिता ठेवले आहे त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांना या स्टेजला प्रतिवादी क्र.७ च्या प्रतिदाव्याला कैफियत दाखल करता येणार नाही. प्रकरण लांबविण्याच्या हेतूने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी क्र.२ यांच्या अर्जास प्रतिवादी क्र.७ यांनी निशाणी-१३८ कडे उत्तर दाखल करुन त्यामध्ये निवेदन केले की, प्रतिवादी क्र.२ यांना प्रतिवादी क्र.७ प्रतिदावा दाखल करित असल्याची माहिती झाली होती. त्यानंतरसुध्दा प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या प्रतिदाव्यास कैफियत दिली नाही.

४) वादी आणि प्रतिवादी क्र.२ व ७ यांचा युक्तिवाद ऐकला. मुद्दा निर्माण होतो की, सदरचे प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्यकरिता प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.२ ने दाखल केलेला सदरचा अर्ज स्विकारणे योग्य आहे काय? आणि प्रतिवादी क्र.२

यांना प्रतिवादी क्र.७ ने दाखल केलेल्या प्रतिदाव्याला कैफियत दाखल करण्यास परवानगीदेणे योग्य आहे काय? दाव्याचे अवलोकन केले असता दिसुन येते की, प्रतिवादी क्र.७ यांनी निशाणी-६६ कडे कैफियत दाखल केली. त्यानंतर निशाणी-९७ कडे दावा दुरुस्ती कैफियत व प्रतिदावा दाखल केला आणि त्यावर न्यायालयाने प्रतिदाव्याला योग्य तो पुरेसा स्टँम्प देण्याचा आदेश करण्यात आला. प्रतिवादी क्र.२ च्या कथनाप्रमाणे फाईल असा आदेश प्रतिवादी क्र.७ यांनी दाखल केलेल्या कैफियतवर केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांना प्रतिवादी क्र.७ यांनी प्रतिदावा दाखल केल्याचे माहिती होती. परंतु प्रतिवादी क्र.२ यांनी त्यावेळी प्रतिवादी क्र.७ यांच्या प्रतिदाव्यास कैफियत दाखल केली नाही. प्रश्न निर्माण होतो की, प्रतिवादी क्र.२ यांना प्रतिवादी क्र.७ यांनी दाखल केलेल्या प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्याचा अधिकार आहे काय? दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६ (अ) अन्वये वादीने दाखल केलेल्या दाव्यास कोणत्याही प्रतिवादीला प्रतिदावा दाखल करण्याचा अधिकार आहे. या तरतुदीमध्ये एका प्रतिवादीने दाखल केलेल्या प्रतिदाव्याला दुसरा प्रतिवादीला कैफियत देण्याचा अधिकार असल्याचे नमुद नाही. प्रतिवादी क्र.७ यांनी निशाणी-९७ कडे दाखल केलेल्या प्रतिदाव्याचे निरिक्षण केले असता दिसुन येते की, सदरचा प्रतिदावा नसुन हा वादीच्या समर्थ दाखल केलेले एकप्रकारचे कथन आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६ (अ) अन्वये प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.७ यांनी केलेल्या तथाकथीत प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्याचा अधिकर प्राप्त होत नाही. करिता सदरचा अर्ज नामंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २१/१२/२०२२

(बी.एस.लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.